**संक्षिप्त फौजदारी केस नं. ५०/२०२३**
**नि. क्र. ४०**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – गणेश सुरेश गांधी,

**वय**– ३६ वर्षे , **व्यवसाय** – व्यवसाय,

**राहणार**– कोंडगाव, वाणीवाडी, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. दिनांक २९/१०/२०२२ रोजी मी कोंडगाव येथे माझ्या घरी हजर होतो. त्यादिवशी संध्याकाळी ०८:४५ च्या सुमारास काहीही घडले नव्हते. मी माझ्या घरीच हजर होतो. असे काही घडले नाही की, कोंडगाव, कातळवाडी येथे एखादी घटना घडली होती. त्यावेळी वाडीतील एका मित्राचा मला फोन आला होता व त्याने मला कोंडगाव तिठा येथे अपघात झाल्याचे सांगितले होते. त्याव्यतीरीक्त त्याने मला काहीही सांगितले नाही.

***(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)***

**०२**. मी आरोपीला ओळखतो. ते माझ्या वाडीतील राहणारे असुन ते माझ्या वाडीतील लोकांचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९/१०/२०२२ रोजी कोंडगाव, कातळवाडी येथे लोकांची गर्दी झालयाने मी

तेथे पाहण्यासाठी गेलो असताना तेथे एक वॅगनर कार क्रमांक एमएच–०१–डीई–४७४९ ही रस्त्याच्या कडेला रत्नागिरी दिशेला तोंड करुन खड्डयात उभी असलेली दिसली. साक्षीदार पुढे सांगतो की, मी त्यादिवशी तिकडे गेलोच नव्हतो. दुसऱ्या दिवशी सकाळी ०८:३० च्या सुमारास मी दुकानाकडे जात असताना मला सदरची गाडी तेथे दिसली होती. सदरच्या गाडीला मी पुढे जावुन पाहिले नाही. दुकानात जात असताना ती मला दिसली होती.

०३. *(<u>साक्षीदारास त्याच्या तपासटिपणातील चिन्हांकीत भाग अ कडील मजकुर त्याला वाचुन दाखविण्यात आला</u>)*. सदरचा मजकुर खरा नाही. तो तसा का नमुद करण्यात आला आहे, याचे काही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, वॅगनर गाडी ही तेथे चालकाच्या ताब्यातुन रॉग साईडला गेल्याने रत्नागिरीकडुन येणाऱ्या ट्रकला ठोकर लागुन वॅगनर गाडी रोडच्या खाली जावुन अपघात झाल्याचे मला समजले होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथील लोकांनी त्या इसमाला उपचारासाठी खाजगी वाहनाने साखरपा येथील सरकारी दवाखान्यात घेवुन गेले होते. हे मला माहिती नाही की, अपघातातील ट्रक चालक याने साखरपा पोलीस दुरक्षेत्र येथे जावुन अपघाताची खबर दिल्याचे मला समजले होते. हे मला माहिती नाही की, सदर अपघात हा वॅगनर चालक – मनोज जागुष्टे याच्या चुकीमुळे झाला असल्याचे मला तेथे समजले. हे म्हणणे खरे आहे की, मनोज जागुष्टे याला लिलावती हॉस्पीटल, मुंबई येथे नेण्यात आल्याचे मला समजले होते.

०४. *(<u>साक्षीदारास त्याच्या तपासटिपणातील चिन्हांकीत भाग ब कडील</u>*

***मजकुर त्याला वाचुन दाखविण्यात आला)***. सदरचा मजकुर खरा नाही. तो तसा का नमुद करण्यात आला आहे, याचे काही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता व त्यामध्ये सदरचा मजकुर नमुद करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्याने त्याला मदत करण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. सी. आठल्ये यांच्याकडुन –**

**०५**. हे म्हणणे खरे आहे की, अपघात कसा झाला हे मी प्रत्यक्ष पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघात कोणाच्या चुकीमुळे व कसा घडला हे मला सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.02.03 18:15:51 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. ०३.०२.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 03/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 03/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 03/02/2026 |